# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.01.2025** **वार-बुधवार**

---

**तपासणी**

राज्यातील सर्व खासगी रुग्णालयांची तपासणी आरोग्य विभागाकडून केली जाणार आहे. या तपासणीची पुणे विभागाचे आरोग्य उपसंचालक डॉक्टर राधाकिशन पवार यांनी नियमावली तयार केली आहे. ही तपासणी 15 दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी महापालिकेचे आरोग्यप्रमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि शल्यचिकित्सक यांना दिले आहेत. रुग्णालयातील डॉक्टर आणि परिचारिकांची निकषाप्रमाणे संख्या आणि रुग्णालयाबाहेर लावलेले दरपत्रक या बाबींची तपासणी केली जाणार आहे.

**ऊस तोड कामगार**

राज्यात साखर कारखान्यांचे गाळप हंगाम सुरू झाल्यानंतर ऊस तोडणीसाठी स्थलांतरित झालेल्या असाक्षर कामगारांचं शिक्षण अखंडित सुरू रहावे म्हणून कारखाना परिसरात त्यांच्यासाठी अध्ययन-अध्यापन वर्ग सुरू करण्याचे आदेश साखर आयुक्तांनी राज्यातील सर्व साखर कारखान्यांना दिले आहेत. त्यामुळे राज्यात गाळप हंगाम सुरू केलेल्या 96 सहकारी आणि 93 खाजगी अशा 189 साखर कारखाना परिसरातील फडात  अध्ययन-अध्यापन वर्ग सुरू केले आहेत. 15 आणि त्यापुढील वयोगटातील असाक्षरांसाठी प्रौढ शिक्षण ऐवजी ‘सर्वांसाठी शिक्षण’ या नावाने हा कार्यक्रम सुरू असून चालू शैक्षणिक वर्षात आत्तापर्यंत 4 लाख 92 हजार इतक्या असाक्षरांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात गावोगावी असे वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

**ई-ऑफीस**

दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीच्या अंमलबजावणीनंतर ई-ऑफिस या संकल्पनेला चालना देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना डिजिटल कार्यपद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आलं. येत्या 26 जानेवारीपासून नव्या प्रणालीद्वारे नोंदणीचं कामकाज सुरू होणार आहे. या

प्रणालीच्या अंमलबजावणीमुळं नागरिकांना अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि नागरीक केंद्रित सेवा मिळणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**मालमत्ता**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून एक लाखाहून जास्त थकबाकी असणाऱ्या सर्व थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्तांवर जप्ती कारवाईची धडक मोहिम सुरु करण्यात आली आहे. एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता तत्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयातील प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार, करसंकलन विभागानं 7 जानेवारीपर्यंत 418 मालमत्ता जप्त केल्या असून, त्यांच्याकडं 11 कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता कर थकीत आहे. शहरातील एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्यांमध्ये खासगी संस्था, खासगी महाविद्यालयं आणि शाळा, हॉटेल, खासगी रुग्णालयं, पेट्रोल पंप, औद्योगिक कारखाने, शोरुम, मंगल कार्यालय, बँक, मॉल, चित्रपटगृहं आदी आस्थापनांचा समावेश आहे.

**पीओपी**

पीओपीला पर्याय म्हणून शाडू माती, कागद, तसंच इतर पर्यायांचा वापर करावा, अशा सूचना पुणे महापालिकेनं मूर्तिकारांना दिल्या आहेत. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं 2020 मध्ये मूर्ती बनविणारे कारागीर आणि उत्पादकांसाठी मार्गदर्शक तत्त्वं जाहीर केली आहेत. मात्र, गेल्या चार वर्षांत गणेशोत्सवाच्या काही दिवस आधी याबाबतचे आदेश काढले जात असल्यानं तोपर्यंत वेळ निघून जाते. त्यामुळं महापालिकेनं यंदा नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच पुणे  शहरातील मूर्तिकारांची बैठक घेत या निर्णयाची माहिती दिली. शहरातील 25 ते 30 मूर्तिकार या बैठकीस उपस्थित होते. या वेळी महापालिकेनं त्यांच्याही अडचणी ऐकून घेऊन त्या सोडविण्याचं आश्वासनही दिल्याचं पर्यावरण विभागाचे उपायुक्त संजय शिंदे यांनी सांगितलं.

**जर्मन**

पुण्यातील फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालय आणि जर्मनीतील हेल्मबंडशुल, न्यूनस्टॅट ऍम कोखर यांच्यातील आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण कार्यक्रमातील महत्त्वाचा टप्पा नुकताच मोठ्या उत्साहात आणि सांस्कृतिक अभिमानानं साजरा करण्यात आला. भारत आणि जर्मनीतील शिक्षक, विद्यार्थी आणि मान्यवरांना एकत्र आणून आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या सामर्थ्याचा हा कार्यक्रम उल्लेखनीय पुरावा ठरला. यामध्ये 2023-24 या शैक्षणिक वर्षातील देवाणघेवाण कार्यक्रम आणि अभ्यास दौऱ्यावर पुस्तक प्रकाशित करण्यात आलं. मराठी, इंग्रजी आणि जर्मन भाषेतील कवितांचं पठण, जागतिक आणि प्रादेशिक वाद्य संगीत, आणि सुंदर नृत्य प्रदर्शनही सादर करण्यात आलं.

पुणे आणि परिसरात उद्या किमान 14 अंश तर कमाल 31 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, संध्याकाळी सहा वाजता, नमस्कार.**